June-2020 (1)

# माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकारातील अर्ज

-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 01 मा. अ.
दिनांक: 18/6/2020

प्रती,

विधी विभाग प्रमुख,
मीरा – भाईदर मनपा

१) अर्जदार नाव : राकेश जे. अगरवाल

२) अर्जदार संपूर्ण पत्ता : शॉप क्र. ८,९,१० व ११, जानकी रेसिडेन्सी, ९० फीट रोड भायंदर (प). तालुका जिल्हा- ठाणे ४०१ १०१.

४) मोबाईल क्रमांक : ९८२१९८१३६२

३) हव्या असलेल्या माहितीचा विषय : हव्या असलेल्या माहितीची विषय मुंबई उच्च न्यायालयात दाखल केस क्र. २७९२/२०२० बाबत.

४) हव्या असलेल्या माहितिशी संबधित कालावधी : २०१० ते २०२० जून.

५) हव्या असलेल्या माहितीचा तपशील : मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या केस क्र.२७९२/२०२० मध्ये दि. १२/०३/२०२० रोजी माननीय न्यायाधीश श्री. काथावाला हत्यानी मिरा-भायंदर महानगरपालिकेस सदर केस मधील वादी म/स. सालान्पूर गृह निर्माण त्यांना ओ सी देण्या बाबत हरकत नसत्याचे स्वच्छ लिहिले आहे.

तरी सदर प्रक्रणी नगर रचना विभाग कडून आपणा कडे अभिप्राय घेतला असल्यास मला त्याचा छांयाकिंत प्रती हव्या आहेत.

६) अर्जदार दारिद्र रेषेखालिल आहे किवा कसे : ? नाही

7) माहिती कशाप्रकारे हवी आहे : माहिती तयार होताच मला माइया मोबाईल. ९८२१९८१३६२ कळवावी.

**ठिकाण : भायंदर**
**दिनांक ;१७/०६/२०२०**

**सोबत: १. दि. १२/०३/२०२० चे न्यायालायिन आदेश.**

सही/-

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०१/२०२०-२१
दि. २२/०६/२०२०

प्रति,

श्री. राकेश अगरवाल
शॉप क्र. ८,९,१० व ११, जानकी रेसिडेन्सी,
९० फुट रोड, भाईंदर (प) ता. जि. ठाणे ४०११०१

**विषय :-** केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.

**संदर्भ :-** आपला दि. १७/०६/२०२० (प्राप्त दि. १८/६/२०२०) रोजीचा अर्ज.

महोदय,

आपण संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण रिट याचिका क्र. २७९२/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १२/०३/२०२० रोजी भोगवटा दाखला देणेबाबत आदेशित केले आहे. त्याबाबतीत नगररचना विभागाने विधी विभागाचे अभिप्राय घेतले असल्यास सदर अभिप्रायची प्रत अपेक्षिली आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, मौजे नवघर, सं. क्र. २५०/२, २५१/१२ जुना, ४६/२, ४७/१२ नविन या जागेबाबत विधी विभागामार्फत नगररचना विभागास दि. २९/७/२०१९ रोजी विधी विभागाने अभिप्राय दिलेले आहे सदर अभिप्रायची प्रत आपणास दि. २१/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तद्नंतर उक्त याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १२/०३/२०२० रोजी पारीत केलेले आदेश नगररचना विभागास दि. ४/५/२०२० रोजीच्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीस्तव कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर नगररचना विभागाने सदर बाबतीत विधी विभागाचे अभिप्राय घेतलेले नाही.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. अजित मुठे, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Svenadke

24/6/20

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका